MAEER'S
MAHARASHTRA INSTITUTE OF TECHNOLOGY
MUMBAI, BHARAT
Near Green Valley Studios, Mira Read East,
Mumbai, Maharashtra- 401107.

Date :- 02-09-2025

# ADMISSION NOTICE

As per the circular of CET Cell No. 7/2025/2827 Dated: 04/09/2025, the revised schedule for First Year Engineering Institute Level Admissions for Academic Year 2025-26 is as follows:

| Sr. No. | Activity | Schedule Date |
|---|---|---|
| 1 | Application form distribution and acceptance duration | 25/07/2025 to 08/09/2025 |
| 2 | Display of Provisional Merit list | 09/09/2025 |
| 3 | Submission of Grievances if any | 10/09/2025 |
| 4 | Display of Final General Merit list Institute Level | 11/09/2025 |
| 5 | Commencement of Admission for Institute Level | 12/09/2025 To 13/09/2025 |
| 6 | Last Date of Admission for all type of Admission | 15/09/2025 |
| 7 | Cut-off Date for all type of Admissions | 15/09/2025 |

Dr. Vilas Nitnaware,

Principal,

MAEER's MIT Thane.

PRINCIPAL
MAEER's MIT Thane
Near Green Valley Studios, Mira Road (E),
Thane, Maharashtra- 401 107.

MAEER'S MIT THANE

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

ई-मेल: fra.govmh@gmail.com
संकेतस्थळ: www.mahafra.org
दूरध्वनी: ०२२-३१९८०३४८ / मोबाईल क्र.८८२८७८६२६४

## शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त

**दिनांक : २४ एप्रिल, २०२५**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क नियमन) कायदा, २०१५ च्या कलम ११ (२)(३)(४) अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियमन प्राधिकरणाची बैठक दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

**खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :**

| | | |
|---|---|---|
| १ | माननीय न्यायाधीश व्ही.एल.अचलिया (निवृत्त)<br>अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| २ | डॉ.विजय वसंत खोले<br>मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ३ | श्री.मनोज दामोदर चांडक<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ४ | श्री.नितीन बापुराव चव्हाण<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ५ | श्री.रत्नाकर (शिरीष) फडतरे<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री.अतुल दामोदर धारप<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ७ | ॲड.श्री.धर्मेंद्र दिलीप मिश्रा<br>व्यावसायिक शिक्षणतज्ञ,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ८ | संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | श्री.प्रमोद नाईक, सहसंचालक (तंत्रशिक्षणचे प्रतिनिधी)<br>उपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | डॉ.प्रकाश बच्छाव, सहसंचालक<br>उपस्थित (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे) |
| १० | आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | डॉ.सुनिल लिलानी<br>आयुक्तांचे प्रतिनिधी<br>उपस्थित |
| ११ | संचालक, आयुष (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | डॉ.प्रशांत दळवी<br>(आर.ए.राठोड आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई)<br>उपस्थित |
| १२ | महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | डॉ.वाय.सी.साळे<br>उपस्थित (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे) |
| १३ | डॉ.अर्जुन चिखले, भा.प्र.से.<br>सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

**विषय क्र.१ दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत**

चर्चा झाली.

दि.०९ एप्रिल, २०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले आणि मंजूर झाले.

**विषय क्र.२ जामखेड येथील रत्नदीप महाविद्यालय चालविणा-या बी.ए.एम.एस.अभ्यासक्रमाविरुध्द विद्यार्थ्यांकडून आलेल्या तक्रारींचा विचार करण्यासाठी**

आजच्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीच्या सुनावणीसाठी रत्नदीप महविद्यालयाचे प्राचार्य, श्री. भास्कर मोरे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे कर्मचारी, महाराष्ट्रातून वेगवेगळया ठिकाणाहून पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

तसेच डॉ.साळे, महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे यांनी सांगितले की, कृषी अभ्यासक्रमासाठी २०% व्यवस्थापन (Management) कोटा आहे, परंतु NRI कोटा नाही.

डॉ.प्रकाश बच्चाव, सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी या विभागांतर्गत येणा-या व प्राधिकरण कक्षेत येणा-या अभ्यासक्रमाच्या व्यवस्थापन / अनिवासी भारतीय कोटयाबाबत किती शुल्क आकारावे याबाबत सध्या माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. याबाबत सर्वश्री मा.संचालक यांचेशी संपर्क करुन लिखित स्वरुपात आपणास कळवितो असे सांगितले.

तथापि, प्राधिकरणाने यापूर्वी **दि.१९.०३.२०१८** रोजीच्या बैठकीत वैद्यकीय शिक्षण या विभागांतर्गत येणा-या पदवी (UG) अभ्यासक्रमाच्या व्यवस्थापन कोटासाठी तीन पट आणि पदव्युत्तर पदवी (PG) अभ्यासक्रमाच्या कोटासाठी चार पट कमाल मर्यादापर्यंत तसेच अनिवासी भारतीय कोटयासाठी वैद्यकीय अभ्यासक्रम (पदवी / पदव्युत्तर) पाच पट कमाल मर्यादा घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता.

त्या अनुषंगाने वरील मुद्दयाचे व प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून प्राधिकरण खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :

मा.मंत्री महोदय यांच्या दिनांक २५.०२.२०२५ च्या इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशानुसार प्राधिकरणाने सविस्तर चर्चा करुन वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या व्यवस्थापन / अनिवासी भारतीय कोटासाठी पूर्वी दि.१९.०३.२०१८ व तदूनंतर घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करुन यापुढे सरसकट शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून वैद्यकीय शिक्षण विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग /कृषी विभाग /उच्च शिक्षण या विभागातील येणा-या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना **व्यवस्थापन कोटाकरीता तीन पट इतक्या कमाल मर्यादेपर्यंत शुल्क व अनिवासी भारतीय कोटाकरीता येणा-या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पाच पट इतक्या कमाल मर्यादेपर्यंत शुल्क लागू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येत आहे.** तसेच अनिवासी भारतीय नसलेली / नसलेला (Against Non Resident Indian) जागेसाठी तीन पट कमाल मर्यादेपर्यंत शुल्क घेण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. संस्था या कमाल मर्यादेपेक्षा कमी शुल्क आकारणी करु शकतात.

सुलभ संदर्भासाठी तक्ता खालीलप्रमाणे :

| व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रम | व्यवस्थापन कोटा (Management) | अनिवासी भारतीय (Non Resident Indian) | अनिवासी भारतीय व्यतिरिक्त (Against Non Resident Indian) |
|---|---|---|---|
| पदवी अभ्यासक्रम (UG) | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **तीन पट** कमाल मर्यादेपर्यंत | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **पाच पट** कमाल मर्यादेपर्यंत | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **तीन पट** कमाल मर्यादेपर्यंत |
| पदव्युत्तर अभ्यासक्रम (PG) | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **तीन पट** कमाल मर्यादेपर्यंत | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **पाच पट** कमाल मर्यादेपर्यंत | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **तीन पट** कमाल मर्यादेपर्यंत |

२४